**दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्या न्यायालयात.**

**(अरुण र. व्यवहारे यांचे समक्ष)**

**CNRNO.MHSN070011982022**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १९०/२०२२ नि.क्र.५ वरील आदेश.**

वादी - सदाशिव दरी शेजाळ

विरुध्द

प्रतिवादी- पांडुरंग शामराव शेजाळ व इतर.

.................................................................................................

वादीतर्फे विधिज्ञ - श्री.व्ही.एस.कदम.

प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ - श्रीमती एस.जे.शिंदे.

.................................................................................................

**निशाणी क्र. ५ वरील आदेश**.

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, चे कलम १५१ व आदेशिका ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र. १ ते ९ अथवा त्यांच्यातर्फे इतर व्यक्तींनी मौजे हिंगणगांव, ता.कवठेमहांकाळ येथील गटक्रमांक ६९२ मधील वादीचे घर व विहीरीसाठी येणेजाणेसाठी असणारा १५ फूट रुंदीच्या बैलगाडी रस्त्याच्या वादीच्या वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये करिता अंतरिम मनाई आदेश मिळणेकरता दाखल केलेला आहे.

०२. **वादमिळकत-** मौजे हिंगणगांव, ता. कवठेमहांकाळ येथील गटक्रमांक ६९२ मधील वादीचे घर व विहीरीसाठी येणेजाणेसाठी व शेतमिळकतीमध्ये

येणेजाणेसाठी ग.क्र. ६९२ मधील जुना बेळंकी रस्त्याच्या उत्तर बाजूने पूर्व पश्चिम चालीचा व त्यापुढे दक्षीणउत्तर चालीचा व त्यापुढे पूर्व पश्चिम चालीचा असणारा १५ फूट रुंदीचा बैलगाडी रस्ता, ज्याचे सविस्तर वर्णन वादपत्रात परिच्छेद क्र. १ मध्ये व वादपत्रासोबतच्या हातनकाशामध्ये केलेले आहे (सदर रस्त्यास यापूढे संक्षीप्त रुपात ''*वादातील रस्ता*" असे संबोधण्यात येईल.)

०३. वादीच्या कथनाप्रमाणे, हिंगणगांव येथील ग.क्र. ६९२ मध्ये ३५ आर त्यांची शेतजमीन आहे. सदरची मिळकत पूर्वी वडिलार्जित मिळकत होती. वादी व त्यांचे भाउ महादेव, राजाराम, शामराव, रामचंद्र, लक्ष्मण व भरत यांच्यामध्ये दि १२.०५.१९९५ रोजी वाटणीपत्र झालेले आहे. सदरच्या वाटणीपत्रामध्ये ग.क्र. ६९२ मधील वादीच्या व प्रतिवादी क्र. ८ च्या घरापासून उत्तर बाजूने पूर्व पश्चिम चालीचा बैलगाडी रस्ता ठेवलेला आहे. सदरच्या वाटणीप्रमाणे फेरफार क्र. २४९८ मंजूर होवून त्याची सातबारा सदरी नोंद झाली आहे. सदरच्या वाटणीपत्राप्रमाणे व फेरफार नोंदी प्रमाणे वादी व त्यांच्या भावांमध्ये ग.क्र. ६९२ मधील क्षेत्राची वहिवाट आहे. सदर रस्त्याचा वापर वादी त्याच्या घरी व विहीरीवर जाणे येणे करीता व तसेच जमीनीच्या मशागतीकरीता करीत आहे. सदर रस्त्याव्यतिरिक्त वादीस पर्यायी रस्ता नाही. परंतु अलिकडे प्र.क्र. १ ते ३ सदर रस्त्यावर खडडे काढून त्यावर उकिरडा काढलेला आहे. तसेच त्यांनी वादीच्या घरासमोर संडास खोली बांधून सदर रस्त्यावर घराचा पुढील भाग काढलेला आहे व रस्त्यावर द्राक्ष बागेची झाडे व नारळाची रोपे लावलेली आहेत. दि. १०.०९.२०२२ रोजी प्रतिवादी यांनी वादीस सदर रस्त्याची वहिवाट करण्यापासून अडथळा केला व वादीस जिवे मारण्याची धमकी दिली. प्र. क्र. ८ ने सदरचा रस्ता नांगरुन सपाटीकरण केलेले आहे व प्र. क्र. ४ ते ७ यांनी त्याच्यामध्ये नांगरट करुन सदर रस्त्यावरती सोयाबीनचे पिक घेतलेले आहे.

०४. वादीस पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याने वादीस त्याच्या मिळकतीचा उपभोग घेण्यापासून अडथळा निर्माण होत आहे. परिणामी शेतीची मशागत करणे, जनावरांना चारा ने आण करणे, खत बि-बीयाणे ने आण करणे अडचणीचे झाले आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास बराच अवधी लागणार आहे. परंतु तोपर्यंत मागणी केल्याप्रमाणे मनाई आदेश न मिळाल्यास वादीचे पैशाने न भरुन निघणारे असे नुकसान होणार आहे. उलटपक्षी मनाई आदेश दिल्यास प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता वादीने विनंती केली की, ग. क्र. ६९२ मधील वादीच्या घराजवळील असणा-या उत्तर बाजूने पूर्व पश्चिम चालीच्या बैलगाडी रस्त्याचा उपभोग घेण्यापासून प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी अडीअडथळा न करणेबाबत अंतरिम मनाई आदेश देण्यात यावा.

०५. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचा एकत्रीत लेखी जबाब व प्रस्तुतच्या अर्जाचे उत्तर नि.क्र. ३९ अन्वये दाखल करुन प्रस्तुतच्या अर्जास विरोध दर्शविला. वादपत्रातील बहुतांश कथने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नाकारलेली आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या कथनानुसार, ग.क्र. ६९२ या मिळकतीचे दि. ०७.०६.१९८३ रोजी वादी व प्रतिवादींमध्ये पाच रुपयांच्या स्टॅम्पवरती वाटणीपत्र झालेले आहे व त्या वाटणीपत्राप्रमाणे सर्वजण स्वतंत्र कब्जेवहिवाटीत आहेत. परंतु सदर वाटणीपत्राचा सातबारा उतारा सदरी अंमल झाला नव्हता त्यामुळे सदरचे वाटणीपत्र समोर ठेवून दुसरे वाटणीपत्र करण्यात आले. परंतु मुळात सन १९८३ च्या वाटणीपत्राप्रमाणेच सर्वजण कब्जे वहिवाटीत आहेत. सदर प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, सन १९८३ च्या वाटणीपत्राप्रमाणे विहरीकडे जाण्यासाठी दक्षीण व पश्चिम बाजूने दहा फूट रुंदीचा रस्ता सोडलेला आहे, वादी कथन करीत असलेला रस्ता सदरचे वाटणीपत्रामधून देण्यात आलेला नाही. तरी देखील अलिकडे वादी व त्यांची मुले

खोडसाळपणाने कुरापती काढीत आहेत. त्यांनी तहसिलदार कवठेमहांकाळ यांच्याकडे रस्ता मागणी अर्ज क्र. ५०/२०२२ दाखल केला होता. तो अर्ज नामंजूर होवून प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याबाजूने निर्णय झालेला आहे. वादीने सदरच्या अर्जाचा उल्लेख वादपत्रामध्ये केलेला नाही. त्यामुळे वादीने महत्वाची बाब लपवून ठेवून प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

०६. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांची द्राक्षबाग सन २००२ पासून आहे. त्यामुळे सन २०२२ मध्ये प्रतिवादींनी द्राक्षबाग लावल्याचे खोटे कथन वादीने केलेले आहे. तसेच प्रतिवादींनी त्यांचे घराची सन २०१५ मध्ये डागडुजी केलेली आहे. सदर प्रतिवादींच्या कथनानुसार सन १९८३ च्या वाटणीपत्रात नमूद केल्याप्रमाणे पर्यायी रस्ता आहे. त्यामुळे वादीची कोणतीही अडवणूक होत नाही. वादीने सन १९८३ च्या वाटणीपत्राची बाब न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. मुळात सदरच्या वाटणीपत्रावर वादीची देखील सही आहे. त्यामुळे सदरचे वाटणीपत्र वादीवर बंधनकारक आहे. प्रस्तुतचा खोटा दावा दाखल करुन खोटा अर्ज वादीने दाखल केलेला आहे. वरील कारणांमुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची प्रतिवादी क्र. १ व २ यांनी विनंती केली.

०७. प्रतिवादी क्र. ३ व ८ यांनी हजर होवूनही प्रस्तुतच्या अर्जास उत्तर सादर केले नाही. तसेच प्रतिवादी क्र. ४ ते ९ यांना दावा समन्स व नोटीसांची योग्य रिज्या बजावणी झाली परंतु ते दाव्यात हजर झाले नाही. करीता प्रस्तुतचे प्रकरण त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

०८. वादीचे विधिज्ञ श्री. व्ही.एस.कदम व प्रतिवादीं क्र. १ व २ यांचे विधिज्ञ श्रीमती एस.जे.शिंदे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

०९. अर्ज, म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रे व दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा

युक्तीवाद ऐकता खालील वाद प्रश्न माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापूढे नोंदवलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | प्रथम दर्शनी बाजु वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतो काय? | होकारार्थी. |
| २ | सोयीस्करतेची तुला ही वादीच्या बाजूने आहे, असे वादी सिध्द करतो काय? | होकारार्थी. |
| ३ | मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश वादीच्या बाजूने न झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय? | होकारार्थी. |
| ४ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## **कारणमिमांसा.**

**वादप्रशन क्र. १ ते ३ बाबत**

१०. सदरचे वादप्रश्न क्रमांक १ ते ३ हे एकमेकाशी संलग्न असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीत कारणेमिमांसेकरिता घेण्यात येतात.

११. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, सन १९९५ मध्ये वादी व वादीच्या भावांमध्ये वाटप झालेले असून त्या वाटपाप्रमाणे वादीच्या घरी, विहीरीवर व शेतमिळकतीवर येणेजाणेसाठी वादातील रस्ता देण्यात आलेला आहे. त्या रस्त्याच्या वादीच्या वहिवाटीस प्रतिवादी क्र. १ ते ९ हरकत,अडथळा करीत आहेत. करीता

अंतरिम मनाई आदेशाची आवश्यकता आहे. उलटपक्षी प्र. क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, सन १९८३ मध्ये वाद मिळक्तीचे वाटप झाले असून त्या वाटणीमध्ये वादातील रस्ता देण्यात आलेला नाही. त्यामुळे वादीस वादातील रस्त्याच्या वहिवाटीचा अधिकार नाही. वादीने महत्वाच्या बाबी न्यायालयापासून लपवून ठेवलेल्या आहेत. त्यामुळे वादी मनाई हुकुम आदेश मिळण्यास पात्र नाही.

१२. ग.क्र. ६९२ मधील मिळकत ही वादी व प्रतिवादींची वडिलार्जित मिळकत होती याबाबत वाद नाही. वादीच्या कथनाप्रमाणे सदर मिळकतीचे वाटप सन १९९५ मध्ये झालेले आहे. उलटपक्षी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या कथनाप्रमाणे सदर मिळकतीचे वाटप सन १९८३ मध्ये झालेले आहे. दोनही बाजूंनी दोनही वाटणीपत्रे अभीलेखावर दाखल केलेली आहेत. वादीने दाखल केलेल्या वाटणीपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की वादी, वादीचे इतर सर्व भाउ यांच्यामध्ये दि. १२.०५.१९९५ रोजी आपसात वाटणीपत्र झाले. सदर वाटणीपत्रास शामराव दरी शेजाळ म्हणजेच प्रतिवादी क्र. १ चे वडील व प्र.क्र.२ चे पती हे देखील कब्जेदार व लिहून देणार म्हणून हजर आहेत. सदरच्या वाटणीपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद आहे की ग. क्र. १३६ मधील विहीरीपासून पूर्वेकडे व उत्तरेकडे जाणे येणेसाठी पूर्व बाजूने दक्षीणउत्तर व पूर्व पश्चिम चालीचा बैलगाडी रस्ता हा सर्वांमध्ये समाईकात ठेवलेला आहे. तसेच दि. १६.०५.१९९५ रोजी वादीचा भाउ रामचंद्र यांनी गावकामगार तलाठी यांना अर्ज सादर करुन सदरच्या वाटणीपत्राप्रमाणे सातबारा उतारा सदरी नोंद होण्यासाठी विनंती केली. सदरच्या अर्जाप्रमाणे व दि.१२.०५.१९९५ रोजीच्या वाटणीपत्राप्रमाणे फेरफार क्र. २४९८ मंजूर झालेला आहे. याचाच अर्थ वादातील रस्त्याची देखील सदरच्या वाटणीपत्राप्रमाणे नोंद झालेली आहे. थोडक्यात, सदरच्या वाटणीपत्राचा अंमल झालेला आहे व त्याप्रमाणे सातबारा उतारा सदरी फेरफार क्र.

२४९८ अन्वये नोंदी झालेल्या आहेत.

१३. प्र. क्र.१ व २ यांच्या कथनाप्रमाणे सन १९८३ चे वाटणीपत्र मूळ असून त्याचाच अंमल झालेला आहे. परंतु सदरचे वाटणीपत्राचा अंमल दाखविणे कामी अभीलेखावर एकही दस्त सादर नाही. प्र.क्र. १ व २ यांनी देखील मान्य केले आहे की सन १९९५ मध्ये परत दुसरे वाटणीपत्र तयार करण्यात आले. त्यांच्या कथनानुसार सन १९८३ च्या वाटणीपत्रास अनुसरुनच नवीन वाटणीपत्र तयार करण्यात आले. परंतु सन १९९५ च्या वाटणीपत्रामध्ये सन १९८३ च्या वाटणीपत्राबाबत कोणताच उल्लेख नाही. त्यामुळे सन १९९५ चे वाटणीपत्र सन १९८३ च्या वाटणीपत्रास अनुसरुन होते असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, सन १९८३ चे वाटणीपत्र विश्वासार्ह नाही. त्यावर वादीची सही नाही. तसेच सदरचे वाटणीपत्राचा अंमल झालेला नाही. त्यामुळे ते वाटणीपत्र वादीच्या हक्कावर बंधनकारक असू शकत नाही. वादीने नि.क्र. ४४ वरील फेरिस्तान्वये सन १९८३ च्या वाटणीपत्राची मूळ प्रत दाखल केलेली आहे. त्यावरती अनुक्रमांक सातवर वादीची स्वाक्षरी नाही. परंतु प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाखल केलेल्या छायांकित वाटणीपत्रावर वादीची सही असल्याचे दिसून येते. वादीने अभीलेखावर त्याचे आधारकार्डची प्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन वादीचा जन्म सन १९७० सालचा असल्याचे दिसून येते. वादीचा जन्म १९७० चा असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने सन १९८३ मध्ये वादी हा अज्ञान होता असे प्रथमदर्शनी दिसून येते. वाटणीपत्राच्या छायांकित प्रतीवर वादीची स्वाक्षरी असल्याचे व वादीने दाखल केलेल्या सन १९८३ च्या मूळ वाटणीपत्रावर वादीची सही का नाही याबाबत कोणतेच स्पष्टीकरण प्रतिवादी क्र. १ व २ देवू शकलेले नाहीत. करीता मी या निष्कर्षापर्यंत येतो की, सन १९८३ चे वाटणीपत्र प्रथमदर्शनी विश्वासार्ह वाटत नाही. तसेच सदर

वाटणीपत्राआधारे अंमल झाल्याचे देखील प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. उलटपक्षी सन १९९५ चे वाटणीपत्राचा अंमल झाल्याचा सातबारा उता-यावरुन व फेरफार नोंदीवरुन प्रथमदर्शनी सिध्द होते.

१४. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सन १९९५ च्या वाटणीपत्रामध्ये वादातील रस्त्याचा उल्लेख आहे. सदरचा रस्ता सर्वांना सामाईकात ठेवल्याचा देखील उल्लेख आहे. त्यामुळे वादातील रस्त्याचा उपभोग घेण्यास वादीचा अधिकार आहे. वादीस पर्यायी रस्ता उपलब्ध आहे असे गृहीत धरले तरी वादीस वादातील रस्त्याचा वापर करण्याचा पूर्णपणे कायदेशिर अधिकार आहेत. करीता वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंता येतो की वादीने वादातील रस्ता अस्तीत्वात असल्याबाबत व त्या रस्त्याचा वापर करण्याचा त्यास कायदेशिर अधिकार असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे.

१५. वादीने तहसिलदार यांच्याकडे रस्ता मिळण्यासाठी अर्ज केला होता असे प्रतिवादींच्या कथनावरुन दिसून येते. सदरच्या बाबीबाबत वादपत्रामध्ये नमूद नाही. सदरचा अर्ज नामंजूर झाला असल्याचे दिसून येते. परंतु सदरची बाब यावेळी फारशी महत्वाची ठरत नाही.

१६. ग.क्र. ६९२ मधे वादीचे घर व सामाईक विहीर आहे याबाबत वाद नाही. अशा परिस्थीतीमध्ये वादीस त्याचे घरी व विहीरीवर येणेजाणेसाठी व तसेच शेती मशागतीसाठी बैलगाडी रस्त्याची आवश्यकता आहे. प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी वादीच्या सदर हक्कास अडीअडथळा निर्माण केल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात न भरुन निघणारे असे अतोनात नुकसान होणार आहे. उलटपक्षी सदरचा रस्ता पुर्वीपासून अस्तीत्वात असल्याने मनाई आदेश दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही.

१७. वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की, वादीने प्रथमदर्शनी त्यांची बाजू सिध्द केलेली आहे. अंतरिम मनाई आदेश पारीत न केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे व तसेच वादीस त्या रस्त्याचा उपभोग घेण्यास गैरसोयीचे होणार आहे. उलटपक्षी मनाई हुकुमाचा आदेश दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही व कोणतीही गैरसोय होणार नाही. करिता वादप्रश्न क्र. १ ते ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. ४ बाबत** –

१८. वादप्रश्न क्र. १ ते ३ वरील निष्कर्षावरुन वादी मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित ठरते. वरील सर्व कारणांवरुन वादप्रश्न क्र. ४ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे

## आदेश

१. प्रस्तुतचा नि. क्र. ५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी अथवा त्यांच्यातर्फे इतर व्यक्तींनी मौजे हिंगणगांव, ता.कवठेमहांकाळ येथील गटक्रमांक ६९२ मधील वादीचे घर व विहीरीसाठी येणेजाणेसाठी व शेतमिळकतीमध्ये येणेजाणेसाठी ग.क्र. ६९२ मधील जुना बेळंकी रस्त्याच्या उत्तर बाजूने पूर्व पश्चिम चालीचा व त्यापुढे दक्षीणउत्तर चालीचा व त्यापुढे पूर्व पश्चिम चालीचा असणारा १५ फूट रुंदीचा बैलगाडी रस्ता, ज्याचे सविस्तर वर्णन वादपत्रात परिच्छेद क्र. १ मध्ये व वादपत्रासोबतच्या हातनकाशामध्ये केलेले आहे त्या रस्त्याची वहिवाट करण्यापासून वादीस प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी हरकत,अडथळा करु नये असा अंतरिम मनाई आदेश दाव्याचा अंतिम

निकाल लागेपर्यंत देण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.05.27 09:33:28 +0530

दिनांक २४.०५.२०२४. (अरुण र. व्यवहारे )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ.

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 24.05.2024
Order signed by the
Presiding Officer on -24.05.2024
Order uploaded on -27.05.2024